ला. प्र. वि.

**पोलीस उप अधीक्षक कार्यालय,**

**अॅन्टी करप्शन ब्युरो, जालना**

दुरध्वनी कमांक ०२४८२ –२२०२५२टोल फ्री कमांक –१०६४

dysp.acbjalna@mahapolice.gov.in. dyspacbjalana@gmail.com


**प्रेस नोट** दि. ०२.०४.२०२४

**महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ कार्यालय, जालना येथे मसाला उदयोगाची कर्ज फाईल मंजुरीला पाठवण्यासाठी लाच मागणी करणारे, लाच देण्यास प्रोत्साहन देणारे आणि लाचेची रक्कम स्विकारणा–यास अॅन्टी करप्शन ब्युरो, जालनाचे पथकाने पकडले.**

| | | |
|---|---|---|
| आलोसे यांचे नाव | – | १.सुनिल लक्ष्मण काची वय ५० वर्ष पद–जिल्हा व्यवस्थापक,महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ कार्यालय, हिंगोली, अति. पदभार**जिल्हा व्यवस्थापकमहात्मा फुले मागास वर्ग विकास महामंडळ कार्यालय**,जालना रा.सुवर्णपार्क पिंपळे गुरव पुणे.**(वर्ग २)**<br>२.छाया अशोक वाकोडे वय ५४ पद – कार्यालय सहायक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ कार्यालय,जालना रा.राजश्री शाहुनगर अंबड रोड जालना**(वर्ग ३)**<br>३.आशिष उत्तम जाधव वय २४ पद–संगणक ऑपरेटर,महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ कार्यालय,जालना रा. पाचअंबादेवी मंदीराजवळ जालना**(कंत्राटी )** |
| गुन्हा घ ता वेळ ठिकाण | – | दि. ०२.०४.२०२४ रोजी समाजकल्याण विभाग कार्यालयाचे आवारात जालना येथे. |
| **लाचेची रक्कम** | – | १,५०० रुपये. |

तकारदार यांनी सिंधुकुपा फुडस या नावाने मसाला उदयोग सुरु करण्यासाठी शासनाच्या राष्ट्रीय अनुसुचित जाती वित्त व विकास निगम योजना **(NSKFDC)** अंतर्गत कर्ज मिळणेसाठी ऑनलाईन अर्ज दिला होता, तकारदार यांचे कर्ज प्रकरण मंजुरीला पाठवण्यासाठी कार्यालयातील सहायक आलोसे कं २ श्रीमती वाकोडे यांनी तकारदार यांचेकडे १,५०० रुपये लाचेची मागणी केली, परंतु तकारदार यांची त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, जालना यांचेकडे तकार केली.

सदर तकारीवरुन दिनांक २८.०३.२०२४ रोजी लाच मागणीबाबत पडताळणी केली असता कार्यालय सहायक श्रीमती वाकोडे यांनी तकारदार यांचे कर्ज प्रकरण मंजुरीला पाठवण्यासाठी पंचासमक्ष १,५०० रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पण्ण झाले, तसेच आलोसे कं १ सुनिल काची, जिल्हा व्यवस्थापक यांना भेटण्यास सांगीतले. दि. ०१.०४.२०२४ रोजी तकारदार हे सुनिल काची, जिल्हा व्यवस्थापक यांना भेटले असता, त्यांनी कर्ज प्रकरण मंजुरीला पाठवण्यासाठी पंचासमक्ष मॅडमला ५०० रुपये देवुन टाक, असे म्हणुन लाच देण्यास प्रोत्साहन दिल्याचे निष्पण्ण झाले. त्यावरुन आज दि. ०२.०४.२०२४ रोजी सापळा लावला असता आलोसे कं २ श्रीमती वाकोडे यांनी पंचासमक्ष १,५०० रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम आलोसे कं ३ आशिष जाधव, संगणक ऑपरेटर यांचे कडे देण्याचे सांगुन तकारदार यांचेकडुन आलोसे कं ३ आशिष जाधवयाने श्रीमती वाकोडे यांचे सांगणेप्रमाणे पंचासमक्ष १,५०० रुपये लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेसह अॅन्टी करप्शन ब्युरो, जालनाचे पथकाने रंगेहाथ पकडले आहे. लाचेची मागणी करणारे कार्यालय सहायक, श्रीमती छाया वाकोडे आणि सुनिल काची, जिल्हा व्यवस्थापक अतिरिक्त पदभार यांनाही ताब्यात घेण्यात आले आहे.

आलोसे नामे १.सुनिल लक्ष्मण काची वय ५० वर्ष पद–जिल्हा व्यवस्थापक,महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ कार्यालय, हिंगोली, अति. पदभार**जिल्हा व्यवस्थापकमहात्मा फुले मागास वर्ग विकास महामंडळ कार्यालय**,**जालना(वर्ग २)**२.छाया अशोक वाकोडे वय ५४ पद – कार्यालय सहायक,**(वर्ग ३)** ३. आशिष उत्तम जाधव वय २४ पद–संगणक ऑपरेटर यांचेविरुध्द पोलीस ठाणे कदीम जालना जि जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरु आहे.

**तसेच अॅन्टी करप्शन ब्युरो**, **जालना यांचेकडुन आवाहन करण्यात येते कि, कोणी लोकसेवक स्वत अगर इतरांमार्फत शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खासगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२ – २२०२५२, तसेच टोल फ्री कं १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं.९०११२५५५३ व dysp.acbjalna@mahapolice.gov.in आणि dyspacbjalana @gmail.com वर संपर्क करावा.**

(किरण एम. बिडवे)
पोलीस उप-अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, जालना